विद्यापीठ अनुदान आयोग व

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## राष्ट्रीय चर्चासत्र

# यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाड्.मय




(प्रोसिडिंग)

ISBN-978-93-83401-45-1

दि.२३ व २४ सप्टेंबर २०१६

संपादक: डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

Scanned with CamScanner

| अ.नं. | शोधनिबंधाचे नाव | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| ३५ | 'यशवंतरावांचे भाषा व साहित्यविषयक विचार' | प्रा.डॉ. नकुलवाड दत्तात्रय सोमनाथ | १६४ ते १६९ |
| ३६ | यशवंतराव चव्हाणांचे राजकीय विचार | प्रा.डॉ.आंधळे बी. व्ही. | १७० ते १७२ |
| ३७ | महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण:व्यक्ती आणि साहित्यिक कार्य | डॉ. सोनसळे सा.द. | १७३ ते १७६ |
| ३८ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. शिंदे बी. आर. | १७७ ते १८० |
| ३९ | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक योगदान | प्रा. दहिफळे रामकिशन | १८१ ते १८३ |
| ४० | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र–कृष्णाकाठ | वाकोळे संगीता माधवराव | १८४ ते १८८ |
| ४१ | यशवंतराव चव्हाणांचे साहित्यिक योगदान | प्रा. डॉ. बोडखे जी पी. | १८९ ते १९१ |
| ४२ | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार – यशवंतराव चव्हाण | डॉ. काळे चंद्रकांत प्रभाकर | १९२ ते १९५ |
| ४३ | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. बर्वे ए.पी. | १९६ ते २०० |
| ४४ | यशवंतरावांचे राजकीय विचार | प्रा.डॉ. मिसाळ निवृत्ती विनायक | २०१ ते २०२ |
| ४५ | यशवंतरावांची राजकीय जडणघडण | प्रा.डॉ.शेळके संगिता | २०३ ते२०४ |
| ४६ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'यशवंतराव चव्हाण'यांची कामगिरी | डॉ. साळे मीना | २०५ ते२०७ |
| ४७ | यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणदृष्टी | प्रा.काटकर तात्यासाहेब शिवाजी | २०८ ते२१० |
| ४८ | यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक योगदान | प्रा. पाटील संजय शांताराम | २११ ते२१४ |
| ४९ | राजकीय नेत्याचे आत्मचरित्र कृष्णाकाठ | डॉ. भालसिंग वैशाली श्रीकृष्ण | २१५ ते२२३ |
| ५० | 'ग्रामीण शिक्षण' व 'शेती' बाबत यशवंतराव चव्हाण यांचे विचार | डॉ.ताहेर एच.पठाण | २२४ ते२२७ |
| ५१ | यशवंतराव चव्हाण यांचे ललितगद्य:एक गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार | प्रा. आडविलकर सारिका | २२८ ते२३७ |

# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार

प्रा.डॉ. शिंदे बी.आर.
वाणिज्य विभाग
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ
जि.परभणी

३८

**प्रस्तावना :—**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात, समाज कार्यात, शैक्षणिक कार्यात त्याच बरोबर आर्थिक कार्यात त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. या महान व्यक्तीचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी देवराष्ट्र ता.खानापूर, जि. सांगली येथे झाला. यशवंतराव चव्हाण हे १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र या विषयात पदवीधर झाले.

यशवंतराव यांनी १९३० च्या ब्रिटिश सरकार विरोधी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. १९३२ मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी पहिल्यांदा कारावास भोगला. १९४६ मध्ये मुंबई प्रांताच्या विधिमंडळाच्या निवडणुकीत विजयी झाले. पुढे १९५२ मध्ये मुंबई प्रांताच्या पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आले व ते स्थानिक स्वराज्य पुरवठा खात्याचे मंत्री झाले. संरक्षण मंत्रीपदानंतर १९६६ ते १९७० या काळात गृहमंत्री १९७० ते १९७४ मध्ये अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री ते देशाचे उपपंतप्रधान अशा विविध भूमिका देशाच्या राजकारणात, समाजकारणात, शैक्षणिक त्याच बरोबर अर्थकारणात पार पाडल्या आहेत. त्यातील त्यांचे आर्थिक विचार महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाच्या विकासात उपयोगी पडणारे आहेत ते खालील प्रमाणे.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार :—**

देशाच्या विकासाची भूमिका व्यापक होती. यशवंतरावांचे देशाचा समतोल आर्थिक विकास झाला पाहिजे कारण देशाच्या एका विभागाचा किंवा प्रदेशाचा विकास झाल्यामुळे देशाचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. जर अशा प्रकारचा विकास झाला तर देशातील सर्वच जनतेच्या आर्थिक विकासात वाढ झाली, असे म्हणता येणार नाही. देशातील सर्व भागाचा किंवा प्रदेशाचा व तेथील लोकांचा आर्थिक विकास झाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. देशातील सर्व प्रदेशाचा विकास करण्यासाठी व जे प्रदेश अविकसित आहेत त्यांचा विकास करण्यासाठी नियोजनात प्राधान्य देवून योजनांच्या आराखड्यात त्या प्रदेशाचा समावेश होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. कारण देशातील एखादा विशिष्ट प्रदेश विकासापासून वंचित रहाने परवडणारे नसते. कारण त्या प्रदेशातील लोकांच्या आर्थिक समस्या वाढून त्यांच्यात असंतोष वाढतो. त्याचा परिणाम देशाच्या विकासावर होतो. व सरकारचा वेळ समस्या सोडविण्यात जातो. एवढेच नव्हेतर असंतोषाचे रुपांतर प्रादेशिक वादामध्ये होऊन देशाचे तुकडे होण्यास कारणीभूत ठरतात. त्यासाठी प्रादेशिक वाद निर्माण न करता त्या भागाचा औद्योगिक, सामाजिक व संस्कृतिक घटकांचा विकास झाला पाहिजे असे त्यांनी



Scanned with CamScanner

त्यांचे मत मांडले. हे मत मांडताना एखादा विभाग विकासाच्या बाबतीत मागे असेल तर काही महत्त्वाच्या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. त्या बाबी खालीील प्रमाणे आहेत.

१. देशातील एखादा विभाग आर्थिक विकासात मागे असेल तर तेथे उद्योग धंद्याचे जाळे निर्माण करुन औद्योगिक क्षेत्र वाढवावे.

२. लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन व्यावसायासाठी आर्थिक पुरवठा करणे.

३. मागास प्रदेशात नैसर्गिक साधन संपत्तीचा व मनुष्य बळाचा योग्य वापर करण्यासाठी नियोजन करणे. व उत्पादनाची साधने निर्माण करणे.

अशा पध्दतीने देशातील प्रत्येक प्रादेशिक विभागाचा विकास करण्यासाठी यशवंतराव चव्हाण सतत प्रयत्नशील असत.

२. कृषि व औद्योगिक समाज रचना:

भारतातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कृषी औद्यागिक समाज रचनेची कल्पना यशवंतराव चव्हाण यांनी मांडली. कारण भारत कृषिप्रधान देश असला तरी येथील लोकांची सरासरी जमीन धरणा क्षेत्र कमी आहे. त्यामुळे शेतीच्या लहान लहान तुकड्याची संख्या जास्त असून ओलीता खालील शेतीच्या तुलनेत कोरडवाहू शेतीचे क्षेत्र जास्त आहे. त्यामुळे देशातील लोकांचे आर्थिक उत्पन्न कमी आहे. त्यामुळे शेतीला पूरक उद्योग जोडणे आवश्यक आहे असे यशवंतरावांनी सांगीतले आहे. म्हणून भारतातील कापूस उत्पादकांनी सुतगिरणी चालवावी, तेल बिया पिकविणाऱ्या लोकांनी तेल गिरण्या, ऊस उत्पादकांसाठी साखर कारखाने शेतीला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय असे उद्योग व्यावसाय आणि सहकार क्षेत्र असे संबंध जोडले. यशवंतरावांच्या कल्पनेमुळे देशातील ७०टक्के लोकांना आर्थिक विकासासाठी फायदा झाला म्हणून हे त्यांनी मांडलेले विचार लोकोपयोगी आहेत.

३. सहकार चळवळ ही जनतेची चळवळ:

देशातील ग्रामीण लोकांचा आर्थिक विकास होण्यासाठी सहकार चळवळ ही जनतेची चळवळ व्हावी यासाठी यशवंतरावांनी मनापासून प्रयत्न केले. या त्यांच्या प्रयत्नामुळे १९५० नंतर वेगवेगळया आर्थिक क्षेत्रात सहकार क्षेत्राची लक्षणीय वाढ झाली. विशेषत: महाराष्ट्रात त्यातल्या त्यात पश्चिम महाराष्ट्रात सहकार क्षेत्राची प्रचंड प्रगती झाली. त्यात कृषि उद्योग, विपणन, पतपुरवठा, श्रमिक सहकार, ग्राहक सहकार या क्षेत्रात सहकार चळवळींनी नेत्रदीपक यश मिळवले. हे यशवंतरावांच्या कर्तृत्वामुळे निर्माण झाले. या यशामुळे महाराष्ट्रात १९६० ला सहकार विषयक विधेयक पास करुन एक नवी दिशा दिली.

सहकार चळवळ ही जनतेची चळवळ झाल्यामुळे देशातील ग्रामीण समाजाचा आर्थिक विकास झाला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी त्याच वेळी कृषि औद्योगिक समाज रचना आणि त्यासाठी सहकार चळवळीचा पुरस्कार करुन महाराष्ट्राच्या ग्रामीण लोकांच्या जीवनावर आमुलाग्र बदल घडवून आणला. त्यांचे श्रेय मा.यशवंतराव चव्हाण यांनाच जाते.



Scanned with CamScanner

४. कृषि शिक्षण

देशातील शेतकऱ्याचा आर्थिक विकास व्हावा म्हणून शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीने शेती करावी. त्यासाठी शेतीत नवीन तंत्रज्ञान, शास्त्रीय ज्ञान याचा उपयोग यामुळे शेतीतील पारंपारिक पध्दत बंद किंवा त्यातील अडथळे दूर करून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्याचे आव्हान यशवंतरावांनी केले. परंपरागत शेतीला नवीन शेतीच्या प्रयोगाची जोड देवून शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती बदलेल या वेगवेगळ्या नवीन तंत्रज्ञानाचे व प्रयोगाचे ज्ञान शेतकऱ्याच्या मुलापर्यंत जावे त्यासाठी कृषि विद्यापीठाच्या स्थापनेवर भर दिला.

राज्यात शेतकऱ्याचा व खेड्याचा आर्थिक विकास साधण्यासाठी कृषि विषयक शिक्षणाचे महत्व लक्षात घेवून त्यांनी परभणी व अकोला येथे कृषि विद्यापीठाची स्थापना केली. त्यामुळे शेतकऱ्यांना व त्यांच्या मुलांना शेती विषयक ज्ञान मिळेल व शेतीवर आधारित शेतकरी व त्यांची मुले सज्ञान होतील त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास होईल याचा यशवंतरावांनी प्रयत्न केला.

५. बँकांचे राष्ट्रीयकरण :

ग्रामीण भगाचा व ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होण्यासाठी बॅकांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे असा ठराव १९६४ ला यशवंतरावांच्या प्रेरणेने महाराष्ट्र काँग्रेस, समितीने अखिल भारतीय काँग्रेसला पाठविला. त्याचाच एक भाग म्हणून बॅकांनी देशाच्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी यासाठी १९६९ मध्ये बॅकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. याचे पूर्ण श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते. त्या नंतर यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री झाले, त्यांनी ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी ग्रामीण भागातं बॅकेच्या शाखा उघडल्या याचा परिणाम ग्रामीण भागातील जनतेचा आर्थिक विकास झाला.

६. कर विषयक धोरण :

कर हा देशाला आर्थिक उत्पन्न मिळविण्याचा मार्ग आहे. त्यामुळे भारत सरकार आपले उत्पादन वाढविण्यासाठी वेगवेगळी कर आकारणी करतात. त्याचाच एक भाग म्हणून आठव्या वित आयोगाची नेमणूक यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. प्राप्ती कर, मध्यवर्ती उत्पादन कर, राज्य विक्री कर बसविण्यात आलेला जादा उत्पादन कर, मालमत्ता कर इ. पासून मिळणारा महसूल केंद्र आणि राज्यामध्ये त्याची विभागणी कशी करायची, घटक राज्यांना द्यावयाच्या रक्कमेचे कसे वाटप क़रायचे या बाबतचे अधिकार या आयोगाकडे सोपवण्यात आले.

देशात वाढलेली आर्थिक विषमता कमी व्हावी व देशात समाजवादी समाज रचना निर्माण व्हावी असे यशवंतरावांना वाटे, म्हणून त्यांनी सातव्या वित आयोगाचे निकषापेक्षा वेगळे निकष आमलात आणले व लोकसंख्येचा भार करुन मागासलेपणाला प्राधान्य देण्यात आले. यावरुन असे स्पष्ट होते की आठव्या वित आयोगाच्या माध्यमातून यशवंतरावांनी मागास राज्याच्या विकासासाठी हिस्सा कसा मिळेल याची काळजी घेतली व प्रादेशिक, आर्थिक असमतोल दूर करण्याचा



Scanned with CamScanner

प्रयत्न केला. अशा प्रकारे यशवंतराव चव्हाण यांनी आपले भौतिक, आर्थिक विचार मांडले.

**सारांश :**

यशवंतराव चव्हाण हे काही अर्थतज्ज्ञ नव्हते. परंतू अर्थमंत्री आणि वित्त आयोग यासारख्या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक प्रगती व्हावी त्यासाठी त्यांनी उद्योग, सहकार, शेती व्यवसाय त्याच बरोबर बॅकांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे अशी भूमीका घेतली.

**संदर्भ :—**

१. आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा.पी.आर.कुमानाचे डॉ. विलास खंदारे
२. यशवंत स्मृती ग्रंथ – रामभाऊ जोशी
३. कृष्णाकाठचा माणुस – अरूण शेवते

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbh...